THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 18TH APRIL 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालील आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख ७ माहे मार्च सन १८९५ रोजीं मंजूर केला, तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे:—**

### सन १८९५ चा आक्ट ९ वा.

**पळून गेलेल्या अपराध्यांस स्वाधीन करण्याच्या संबंधानें प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटांस व जिल्हा माजिस्ट्रेटांस विवक्षित अखत्यार व अधिकार देण्याकरितां आक्ट.**

ज्या अर्थीं, सन १८७० चा [ इंग्लंडचा ] अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयीं आक्ट, ह्यांत, इतर ठरावांशिवाय असाही ठराव आहे कीं, तो आक्ट आर्डर इन् कौन्सिलअन्वयें लागू केला असतां, त्या आर्डरींत अन्य प्रकारें ठरविलें असेल तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, प्रत्येक ब्रिटिश मुलुकास तो लागू होईल आणि तो असा लागू होतांना त्यांत इतर फेरफारांशिवाय खालील फेरफार ह्मणजे,—

> कोणत्याही सेक्रेटरी आफ् स्टेटच्या वारंटाची नरूर पडणार नाहीं आणि कोणत्याही पळून गेलेल्या अपराध्यास स्वाधीन करण्याच्या संबंधाचे पोलीस माजिस्ट्रेटास आणि सेक्रेटरी आफ् स्टेट ह्यांस किंवा ह्यांपैकीं कोणासही असलेले सर्व अधिकार अगर त्याच संबंधानें त्या पोलीस माजिस्ट्रेटास आणि सेक्रेटरी आफ् स्टेट ह्यांस किंवा ह्यांपैकीं कोणासही सदहू आक्टाअन्वयें करावयाचा अधिकार दिलेलीं अगर त्यांनीं केलीं पाहिजेत अशीं कृत्यें, त्या ब्रिटिश मुलुकांतील फक्त गव्हर्नरानें केलीं असतां चालतील,

हा फेरफार केला जाईल.

आणि ज्या अर्थी सदर्हू आक्टाअन्वयें असेंही ठरविण्यांत आलें आहे कीं, कोणत्याही ब्रिटिश मुलुकांतील कायदे करणाऱ्या मंडळीनें सदर्हू आक्ट मंजूर होण्याच्या आधीं अगर नंतर केलेल्या कोणत्याही कायद्यामध्यें अगर हुकुमामध्यें जर, जे पळून गेलेले अपराधी त्या मुलुकांत असतील अगर असल्याविषयीं संशय असेल त्या अपराध्यांस त्या मुलुकांत स्वाधीन करण्यासाठीं ठराव केलेले असले, तर मलिका माआझमा ह्यांस, सदर्हू आक्ट कोणत्याही परकी संस्थानाच्या बाबतींत लागू करतांना करावयाच्या आर्डर इन् कौन्सिलअन्वयें अगर तदनंतरच्या कोणत्याही हुकुमाअन्वयें एकतर—

सदर्हू आक्ट अगर त्याचा कोणताही भाग त्या परकी संस्थानास जेवढा लागू असेल तेवढ्यापुरता, आणि सदर्हू प्रकारच्या कोणत्याही ब्रिटिश मुलुकांत सदर्हू प्रकारचा कोणताही कायदा अगर हुकुम अमलांत राहील तोंपर्यंत मात्र, त्या आक्टाचा अगर त्याच्या त्या भागाचा अमल अशा ब्रिटिश मुलुकांत तहकूब करण्याचा अधिकार आहे,

अगर सदर्हू कायदा अगर हुकुम अगर त्याचा कोणताही भाग सदर्हू आक्टाचा अंश असल्याप्रमाणेंच सुधारणा व फेरफार यांनिशीं अगर त्यांशिवाय अशा ब्रिटिश मुलुकांत अमलांत राहील असें फर्माविण्याचा अधिकार आहे;

आणि ज्याअर्थी, सदर्हू सन १८७० च्या अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींच्या आक्टाची सुधारणा सन् १८७३ च्या अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींच्या आक्टाअन्वयें करण्यांत आलेली असून, त्या सन १८७३ च्या आक्टांत, तो आक्ट व सन १८७० चा सदर्हू आक्ट ह्यांस एकच समजावें असें आणि त्या दोन्ही आक्टांचा एकत्र उल्लेख करावयाचा असल्यास त्यांस सन १८७० व १८७३ चे अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींचे आक्ट ह्मणावें, असें ठरविलें आहे;

आणि ज्या अर्थी, पळून गेलेल्या अपराध्यांस स्वाधीन करण्यासंबंधाचे जे अख्त्यार व अधिकार सदर्हू आक्टांअन्वयें युनैटेड किंग्डममध्यें पोलीस माजिस्ट्रेटांस व जस्टिस आफ् धी पीस यांस दिलेले आहेत ते प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटांस व जिल्हा माजिस्ट्रेटांस देऊन सदर्हू सन १८७० व १८७३ चे अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींचे आक्ट ब्रिटिश हिंदुस्थानांत जास्त चांगल्या रीतीनें अमलांत आणणें इष्ट आहे;

त्या अर्थी, ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहेः—

(१) ह्या आक्टास सन १८९१ चा अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींचा (हिंदुस्थानचा) आक्ट असें ह्मणावें; आणि सरनामा व सुरुवात.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे ह्या आक्ट अमलांत येण्याची जी तारीख इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन ठरवितील, त्या तारिखेस तो अमलांत येईल.

मात्र इतकेंच कीं, हा आक्ट, सन १८७० चा अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयीं आक्ट ह्याचा भाग असल्याप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानांत अमलांत यावा असें मलिका माआझमांकडून आर्डर इन् कौन्सिलअन्वयें फर्माविण्यांत येई तोंपर्यंत आणि अशी आर्डर इंडिया गॅझेटमध्यें छापून प्रसिद्ध होई तोंपर्यंत सदर्हू प्रकारची कोणतीही तारीख नेमण्यांत येणार नाहीं.

बादशाही आक्टामध्यें पोलीस माजिस्ट्रेटांस व जस्टिस आफ् धी पीस ह्यांस दिलेले अधिकार प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटांस व जिल्हा माजिस्ट्रेटांस दिले आहेत.

२. पळून गेलेल्या अपराध्यांस युनैटेड किंग्डममध्यें स्वाधीन करण्यासंबंधानें कोणत्याही पोलीस माजिस्ट्रेटास अगर कोणताही जस्टिस आफ् धी पीस ह्यास सन १८७० व १८७३ चे अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींचे आक्ट ह्यांअन्वयें जो जो अख्त्यार दिलेला आहे आणि जें जें काम करण्यास अधिकार दिलेला आहे अगर हुकुम केलेला आहे तो तो अख्त्यार आणि तें तें काम, पळून गेलेल्या अपराध्यांस सदहू आक्टाअन्वयें स्वाधीन करण्याचा संबंधानें कोणत्याही प्रेसिडेन्सी माजिस्टेटाकडे अगर जिल्हा माजिस्ट्रेटाकडे ह्या कलमावरून सोंपविण्यांत येऊन, त्यानें त्याचसंबंधानें ब्रिटिश हिंदुस्थानांत तो तो अख्त्यार चालवावा, आणि तें तें काम करावें असें ठरविलें आहे.

( सही ) जे. एम्. म्याक्फर्सन्,
आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालील आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख ७ माहे मार्च सन १८९५ रोजीं मंजूर केला तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे:—**

## सन १८९५ चा आक्ट १० वा.

**सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांचा आक्ट ह्याअन्वयें नोंदलेल्या रेलवे कंपन्यांनीं रेलवे बांधीत असतांना भांडवलांतून व्याज द्यावें असें ठरविण्याकरितां आक्ट.**

ज्या अर्थी सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांचा आक्ट ह्याअन्वयें नोंदलेल्या रेलवे कंपन्यांनीं रेलवे बांधीत असतांना भांडवलांतून व्याज द्यावें असा ठराव करणें इष्ट आहे, त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) ह्या आक्टास, सन १८९५चा हिंदुस्थानचा रेलवे कंपन्यांबाबदचा आक्ट असें ह्मणावें.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे, आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

व्याख्या.

२. ह्या आक्टांत, विषयास अगर संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर,—

(१) "रेलवे" ह्या शब्दाचा अर्थ, सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेबाबद आक्ट, कलम ३, रकम (४), ह्यांत व्याख्या केलेली रेलवे, असा समजावा;

(२) "ती रेलवे" ह्या संज्ञेचा अर्थ, जी रेलवे बांधण्याच्यासंबंधानें, ह्यानंतर ठरविल्याप्रमाणें, भांडवलांतून व्याज देण्याची परवानगी दिलेली असेल, ती रेलवे, असा समजावा; आणि

(३) "रेलवे कंपनी" ह्या संज्ञेचा अर्थ, सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांचा आक्ट ह्याअन्वयें नोंदलेली आणि हिंदुस्थानांत कोणतीही रेलवे बांधण्याच्या व चालविण्याच्या कारणासाठीं अगर बांधण्याच्या किंवा चालविण्याच्या कारणासाठीं उभा-

रलेली कंपनी असा समजावा ; मग ती कंपनी अशा एकाच कारणासाठीं असली तरी चालेल अगर त्या कारणाशिवाय इतर कारणांसाठींही असली तरी चालेल.

भांडवलांतून व्याज देण्याबाबद.

३. कोणत्याही रेल्वे कंपनीस, आपल्या भांडवलांतून, शेरांबद्दल खरोखर भरलेल्या भांडवलावर, ह्या कलमांत सांगितलेल्या मुदतीपर्यंत व त्यांत दाखल केलेल्या शर्तींस व निर्बंधांस पात्र राहून, व्याज देण्याचा, आणि असें दिलेलें व्याज सदर्हू रेल्वे बांधण्यास लागणाऱ्या खर्चाचा भाग ह्मणून भांडवलाखातीं खर्च घालण्याचा, अखत्यार आहे:—

(१) असें व्याज, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे ठरवितील त्या मुदतीपर्यंत मात्र दिलें पाहिजे ; आणि अशी मुदत, कोणत्याही प्रसंगीं, ती रेल्वे ज्या साहामाहींत खरोखर पुरी होऊन ट्राफिकास खुली करण्यांत येईल त्या साहामाही नंतरच्या साहामाहीच्या शेवटच्या दिवसापुढें जाऊं नये.

(२) असें व्याज देण्याचा अधिकार त्या कंपनीच्या मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनअन्वयें किंवा त्या कंपनीनें केलेल्या विशेष ठरावाअन्वयें असल्याशिवाय, तें देतां कामा नये.

(३) असें व्याज देण्यास सदर्हूप्रमाणें कंपनीच्या मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनअन्वयें अगर विशेष ठरावाअन्वयें अधिकार असला तरी, तें व्याज गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आगाऊ मंजुरी घेतल्याशिवाय देतां कामा नये.

(४) सदर्हूप्रमाणें कोणत्याही मुदतीबद्दल व्याज ह्मणून भांडवलांतून दिलेली रकम, कोणत्याही प्रसंगीं, त्या मुदतींत त्या रेल्वेच्या झालेल्या नक्की उत्पन्नासह, दरसाल दर शेंकडा चार टक्यांहून जास्त होईल, इतकी असूं नये.

(५) सदर्हूप्रमाणें व्याज द्यावयाचें तें, तें व्याज ज्या शेर-भांडवलाच्यासंबंधानें द्यावयाचें असेल त्या शेर-भांडवलापैकीं निदान दोन-तृतीयांश रकमेचे शेर खरोखर काढण्यांत येऊन घेण्यांत आले आहेत अशी आणि त्या शेरांचे धारण करणारे अगर त्यांचे वारचे त्या शेरांबद्दल कायदेशीर रीतीनें जबाबदार आहेत अशी त्या रेल्वे कंपनीकडून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची खात्री करून देण्यांत येई तोंपर्यंत देतां कामा नये.

(६) ज्या कोणत्याही शेर धारण करणाऱ्याच्या शेरांपैकीं कोणत्याही शेरांवरील कॉल ज्या मुदतीपर्यंत बाकी राहतील, त्या शेर धारण करणारास त्या मुदतीपर्यंतचें सदर्हू प्रकारचें व्याज मिळणार नाहीं.

(७) असें व्याज ज्या शेरांच्या संबंधानें दिलेलें असेल, त्या शेरांबद्दल भरलेली रकम, तसें व्याज दिल्यावरून कमी होईल असें समजूं नये.

रेल्वे वाढविण्यासाठीं उभारलेल्या जास्त शेर-भांडवलास कलम ३ यांतील ठराव लागू करण्याबाबद.

४. जी कोणतीही रेल्वे बांधण्याचें काम चाललें असून जी एकाद्या रेल्वे कंपनीनें आपल्या मालकीच्या अगर आपण चालवीत असलेल्या कोणत्याही रेल्वेशिवाय इतर अगर तिचा वाढविलेला भाग ह्मणून तयार करावी अगर चालवावी असा इरादा असेल, ती रेल्वे ह्या आक्टाच्या कारणांसाठीं त्या कंपनीची रेल्वे आहे असें समजावें, आणि गेल्या शेवटच्या कलमांतील सर्व ठराव अशा रेल्वेस आणि ती बांधण्याच्या कारणांसाठीं काढलेल्या शेर-भांडवलास लागू होतील असें समजावें.

व्यवस्थानिरूपणपत्रकामध्यें व इतर दस्तऐवजांमध्यें जाहिर करण्याबाबद.

५. जेव्हां कोणत्याही रेलवे कंपनीला ह्या आक्टाअन्वयें व्याज देण्याचा अधिकार असेल, तेव्हां, त्या कंपनीचे शेर लोकांनीं घ्यावे ह्मणून काढलेल्या प्रत्येक व्यवस्थानिरूपणपत्रकांत, जाहिरनाम्यांत अगर इतर दस्तऐवजांत आणि अशा प्रत्येक शेराच्या सर्टिफिकेटांत, तो अधिकार असल्याबद्दल लिहिलेलें असलें पाहिजे.

हिशेब.

६. कोणत्याही रेलवे कंपनीनें ह्या आक्टाअन्वयें कोणतेंही व्याज दिलें ह्मणजे, तें व्याज कोणत्या रकमेवर व कोणत्या दरानें दिलें तें त्या कंपनीच्या वार्षिक अगर इतर हिशेबांमध्यें दाखविलें पाहिजे.

कर्ज काढण्याच्या अधिकाराची इयत्ता कशी काढावी.

७. जर कोणत्याही मेमोऱ्यांडम आफ् असोसिएशनवरून, आर्टिकल्स आफ् असोसिएशनवरून अगर इतर दस्तऐवजावरून, कोणत्याही रेलवे कंपनीस किंवा तिच्या डिरेक्टरांस कोणत्याहीं सभेच्या मंजुरीनिशीं किंवा मंजुरीशिवाय पैसा कर्जी काढण्याचा अधिकार दिलेला असेल, आणि ह्याप्रमाणें कर्जी काढण्याचा अधिकार दिलेली रकम, त्या कंपनीच्या भांडवलाच्या अमुक प्रमाणानें असावी असें ठरविलेलें असेल, तर ह्या आक्टाअन्वयें व्याज देण्याच्या कामीं लाविलेली अगर लावावयाची भांडवलांतली रकम, सदर्हू प्रकारच्या कर्जी काढण्याच्या अधिकाराची व्याप्ति निश्चित करतांना, त्या कंपनीच्या भांडवलांतून वाद केली पाहिजे.

जे. एफ् म्याक्फर्सन्,

आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.